# सहसंचालक, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई

जागतिक बँक प्रकल्पांतर्गत इमारत, पहिला मजला, शासकीय तंत्रनिकेतन परिसर ,
४९, खेरवाडी, अलियावार जंग मार्ग, वांद्रे(पूर्व) ,मुंबई ५१.
फोन नं.२६४७ ४८९२ टेलीफॅक्स नं.२६४७ १६१९
ई-मेल- jtdirrom@gmail.com संकेतस्थळ - www.jdteromumbai.com

क्र.४/विकामुं/तंशि/तांत्रिक-४/२०१३/ २३०४
दिनांक :- 19 AUG 2013

प्रति,
प्राचार्य,
शासकिय/अशासकिय अनुदानित
पदविका अभ्यासक्रमाच्या संस्था

विषय :- शैक्षणिक वर्ष २०१३-१४ मधील पदविका अभ्यासक्रमाच्या
प्रथम/द्वितीय वर्षाच्या गुणवत्ता/प्रवेश यादया सादर करण्याबाबत

उपरोक्त विषयान्वये आपणास कळविण्यात येते की, या कार्यालयाच्या अधिनस्त विनाअनुदानित पदविका अभ्यासक्रमाच्या संस्थांच्या शैक्षणिक वर्ष २०१३-१४ मधील प्रथम/द्वितीय वर्षाच्या गुणवत्ता/ प्रवेशयाद्या तपासण्याचे काम **दि. १६.९.२०१३ ते दि. २१.९.२०१३** हया कालावधीत या कार्यालयात होणार आहे.

शासकिय/अशासकिय अनुदानित संस्थेपैकी ज्या संस्था महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाशी संलग्न आहेत त्या संस्थेनी शैक्षणिक वर्ष २०१३-१४ मधील पदविका अभ्यासक्रमाच्या संचालनालयाच्या संकेत स्थळावर अपलोड केलेल्या प्रथम/द्वितीय वर्षाच्या गुणवत्ता/प्रवेश यादया मंजूरीकरिता तीन प्रतीत या कार्यालयात सादर कराव्यात. तसेच ज्या अशासकिय अनुदानित संस्थेमध्ये विनाअनुदानित अभ्यासक्रम चालविले जातात, त्या संस्थांनी देखील सदर अभ्यासक्रमाच्या गुणवत्ता/प्रवेश यादया सोबत जोडलेल्या यादीनुसार तीन प्रतीत मंजूरीकरिता सादर कराव्यात.

शासकिय/अशासकिय अनुदानित संस्थेपैकी ज्या संस्था स्वायत्त आहेत त्या संस्थेनी या कार्यालयाच्या अभिलेखार्थ संचालनालयाच्या संकेत स्थळावर अपलोड केलेल्या प्रथम/द्वितीय वर्षाच्या गुणवत्ता/प्रवेश यादया एका प्रतीत सादर कराव्यात.

तसेच शासकिय/अशासकिय अनुदानित संस्थांनी प्रवेश याद्यांसोबत खालील माहिती सादर करावी.

| अ.क्र. | अभ्यासक्रम | मंजूर प्रवेश क्षमता | भरलेल्या जागा | रिक्त जागा |
|---|---|---|---|---|
| | | | | |

(जी.बी.धनोकार)
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई

Z:\Nikale\Merit List Diploma 2013-14.doc

# Schedule for Merit list Diploma 2013-14
# (Govt. & Govt Aided Institute)

| Sr. No. | Institute Code | Institute Name | Intake | Date |
|---|---|---|---|---|
| 1. | 3006 | Government Institute of Printing Technology, Mumbai | 120 | 16/9/2013 |
| 2. | 3007 | Government Polytechnic, Mumbai | 750 | 16/9/2013 |
| 3. | 3008 | Government Polytechnic, Pen | 260 | 16/9/2013 |
| 4. | 3009 | Government Polytechnic, Ratnagiri | 540 | 16/9/2013 |
| 5. | 3010 | Government Polytechnic, Malvan | 620 | 17/9/2013 |
| 6. | 3011 | Government Polytechnic, Thane | 480 | 17/9/2013 |
| 7. | 3012 | Veermata Jijabai Technological Institute (VJTI), Matunga, Mumbai | 360 | 17/9/2013 |
| 8. | 3013 | Government Polytechnic, Vikramgad. | 240 | 17/9/2013 |
| 9. | 3020 | Sasmira's Institute of Manmade Textiles, Mumbai | 150 | 19/9/2013 |
| 10. | 3021 | K. J. Somaiya Polytechnic, Mumbai | 420 | 19/9/2013 |
| 11. | 3023 | St. Xavier's Technical Institute, Mumbai | 140 | 19/9/2013 |
| 12. | 3024 | Sophia Shree B.K. Somani Memorial Polytechnic, Mumbai | 40 | 19/9/2013 |
| 13. | 3025 | Shri Bhagubhai Mafatlal Polytechnic, Mumbai | 500 | 20/9/2013 |
| 14. | 3026 | M. H. Saboo Siddik Polytechnic, Mumbai | 510 | 20/9/2013 |
| 15. | 3027 | Premlila Vithaldas Polytechnic (Womens), Mumbai | 280 | 20/9/2013 |
| 16. | 3028 | Father Agnel Technical College (Polytechnic), Bandra(W), Mumbai | 60 | 20/9/2013 |
| 17. | 3040 | Dr.Babasaheb Ambedkar Tech.University, Institute of Petrochemical Engineering, Lonere, Raigad | 480 | 20/9/2013 |

# शैक्षणिक वर्ष २०१३-२०१४ मधील प्रथम वर्ष पदविका अभ्यासक्रमाकरिता संस्थांनी गुणवत्ता यादीबरोबर विद्यार्थ्यांची व संस्थेबाबतची सादर करावयाची कागदपत्रे.
## (अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र)

### अ) शैक्षणिक/प्रवेश संबंधित

१. संचालनालयाच्या संकेतस्थळावर अपलोड केलेली प्रवेश यादी प्रत्येक पानावर प्राचार्यांची सही, (नावानिशी)(सही काळया/निळया पेनाने असणे आवश्यक आहे.) पदनामाचा शिक्का, संस्थेचे सीलट
२. कॅपमार्फत प्रवेश झालेल्या विद्यार्थ्यांचे अलॉटमेंट लेटर
३. एस.एस.सी मार्कशिट मूळप्रत – **(For Post SSC Diploma)**
४. एस.एस.सी आणि एच.एस.सी.ची मार्कशिट मूळप्रत **(For Post HSC Diploma)**
५. विद्यार्थ्याची आठवी, नववी ची गुणपत्रिका किंवा नमूना 'झेड'.
६. एस.एस.सी परिक्षेचे गुणपत्रकात **गणिताचा सांकेतांक ७१ व जनरल सायन्सचा सांकेतांक ७२** असणे आवश्यक आहे.
७. शाळा सोडल्याचा दाखल्याची मूळ प्रत. (दुय्यम प्रत असल्यास त्याबाबतचे प्रतिज्ञापत्र)
८. आवश्यक असल्यास गॅप सर्टिफिकेट
९. भारतीय नागरिकत्वाचे प्रमाणपत्र किंवा नागरिकत्वाच्या पुराव्यासाठी जन्मप्रमाणपत्र किंवा पासपोर्ट किंवा शाळा सोडल्याच्या दाखल्यामध्ये जन्मगाव किंवा नागरिकत्वाच्या रकान्यामध्ये तशी नोंद असणे आवश्यक आहे.
१०.सीबीएससी मंडळाच्या शालेयस्तरावर परिक्षा दिलेले विद्यार्थी पदविका अभ्यासक्रमासाठी पात्र नसल्याने, सदर मंडळाच्या विद्यार्थ्यांनी बोर्डाची परिक्षा दिल्याबाबतचा पुरावा. (परिक्षेचे ओळखपत्र इ.कागदपत्रे).
११.जातीचा दाखला (सर्व मागासवर्गीय उमेदवारांकरिता)
१२. एस.सी, एस.टी. प्रवर्गातील विद्यार्थी वगळून इतर सर्व मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना नॉन क्रिमीलेयर सर्टिफिकेट आवश्यक आहे. (Non Creamy Layer) (१ एप्रिल २०१३ ते ३१ मार्च २०१४ पर्यंत मुदत असलेले)
१३. पात्रता प्रमाणपत्र (इतर राज्यातील विद्यार्थ्यांसाठी म.रा.तं.शि.मंडळाने निर्गमीत केलेले)
१४.सांख्यिकी माहिती सप्टेंबर-२०१३ पर्यंतची (जोडण्यात आलेल्या सांख्यिकी माहितीचा/ विवरणपत्राचा ताळमेळ जुळणे आवश्यक आहे)
१५.एकत्रित गुणवत्ता यादीमधील अनुक्रमांक अंतिम प्रवेश यादीत दर्शविण्यात यावेत. (अल्पसंख्यांक कोटा व संस्थास्तरावर केलेल्या प्रवेशासाठी)
१६. अपंगांसाठीचे प्रमाणपत्र/माजी सैनिकांचे प्रमाणपत्र (आवश्यक त्या उमेदवाराकरिता)(विहित नमुन्यात)
१७.टयुशन फी व्हेवर स्कीम अंतर्गत प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या उत्पनाचा दाखला
१८. अल्पसंख्यांकाकरिता - उमेदवार संबंधीत गटात मोडत असल्याचा पुरावा.
१९. पुर्नप्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची माहिती.

### ब) आवश्यक प्रमाणपत्रे/कागदपत्रे

१. कट ऑफ डेटपुर्वी विद्यार्थ्यांचे प्रवेश पुर्ण झाल्याचे व प्रवेश यादी/गुणवत्ता यादी संचालनालयाच्या वेबसाईटवर विहीत मूदतीत टाकल्याचे प्रमाणपत्र.
२. चालू शैक्षणिक वर्षात अभ्यासक्रम पुढे सुरु ठेवण्यास अखिल भारतीय तंत्रशिक्षण परीषद/फार्मसी कौन्सील ऑफ इंडियाचे मान्यतेचे पत्र.
३. संचालनालय, अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली व शासनाचे नवीन संस्था/नवीन अभ्यासक्रम व प्रवेशक्षमता वाढ याबाबत मान्यता दिलेल्या पत्राची प्रत.
४. नवीन संस्थांनी अध्यक्ष/सचिव व संचालक, तंत्रशिक्षण महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या संयुक्त खात्यात रक्कम भरणा केल्याची पावती जोडणे आवश्यक आहे.)

५. संस्था सुरु होऊन दुसरे शैक्षणिक वर्ष सुरु झालेले असेल, अशा संस्थांनी अध्यक्ष/सचिव व संचालक, तंत्रशिक्षण महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या संयुक्त खात्यात पैसे भरल्याची पावती सादर करण्यात यावी.

६. अ) प्रवेशाच्या वेळी शिक्षणशुल्क समितीने निर्धारीत केलेले शैक्षणिक शुल्क आकारण्यात आल्याबाबतचे संबधित संस्था प्रमुखांचे शपथपत्र. (सदर शपथपत्र रु.१००/- च्या स्टॅम्पपेपरवर सादर करण्यात यावे) सोबत शिक्षण शुल्क समितीने निश्चित केलेल्या फीचे पत्र जोडणे. (प्राचार्यांनी सांक्षांकित केलेले)

ब) प्रथम वर्षासाठी संस्थेकडून आकारण्यांत आलेल्या एकूण फीचा तपशील

७. अल्पसंख्याक व संस्थास्तरावरील कोटयातील प्रवेशाचा अर्जाचा तपशिल व त्या अनुषंगाने तयार केलेली गुणवत्ता यादी.

८. अल्पसंख्याक व संस्थास्तरावरील कोटयातील प्रवेशासासाठी प्रसिध्द केलेले प्रवेश फे-यांचे वेळापत्रक, (Admision Schedule & Admission Rounds) प्रवेश फेरीप्रमाणे विद्यार्थ्यांचे उपस्थितीपत्रक इ. कागदपत्रे

९. अ) अल्पसंख्यांक कोटयातील प्रवेशाकरिता दि. २७.५.२०१३ च्या शासन निर्णयानुसार ४ वर्तमानपत्रात जाहिरात देणे आवश्यक असल्यामुळे सदर प्रवेशासाठी देण्यांत आलेल्या ४ वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्दीसाठी दिलेली असेल त्या जाहिरातीचे कात्रण, अर्जाचा नमुना, संस्थेची प्रवेश माहिती पुस्तिका तसेच भाषिक अल्पसंख्यांक संस्थांनी त्या भाषेच्या वृत्तपत्रात जाहीरात दिल्याचे पुरावे

ब ) संस्थास्तरावरील प्रवेशासाठी ज्या वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्दीसाठी दिलेली असेल त्या जाहिरातीचे कात्रण, अर्जाचा नमुना व संस्थेची प्रवेश माहिती पुस्तिका

१०. अल्पसंख्याक कोटयात बिगर अल्पसंख्यांक विद्यार्थ्यांचे प्रवेश केले असल्यास त्यासाठी अल्पसंख्यांक विभागाच्या परवानगीचे पत्र **(प्रवेश निश्चित करण्याच्या दिनांकापुर्वीचे पत्र)**

११. तक्रारींबाबतचा अहवाल (अद्याप या कार्यालयास सादर केलेले नसल्यास)

अ) विद्यार्थी

ब) कर्मचारी/इतर

**शैक्षणिक वर्ष २०१३-१४ मध्ये द्वितीय वर्ष अभियांत्रिकी पदविका प्रवेश यादीसोबत सादर करावयाची कागदपत्रे**

**अ) शैक्षणिक/प्रवेश संबंधित**

१. संचालनालयाच्या संकेतस्थळावर अपलोड केलेली प्रवेशयादी
२. एस.एस.सी/एच.एस.सी परिक्षेची मूळ गुणपत्रिका
३. एमसीव्हीसी/आयटीआय/सेंटर ऑफ एक्सलन्स/द्विलक्षी अभ्यासक्रम इ. अभ्यासक्रमाच्या अंतिम गुणपत्रिका व अंतिम उत्तीर्ण प्रमाणपत्राची मूळ प्रत.(सदर अभ्यासक्रम नियमित दोन वर्षाचा असणे आवश्यक आहे.)
४. शाळा सोडल्याच्या दाखल्याची मूळ पत्र. दुय्यम प्रत असल्यास त्याबाबतचे प्रतिज्ञापत्र
५. आवश्यक असल्यास गॅप सर्टिफिकेट
६. जातीचा दाखला मूळ प्रत (आवश्यकतेनुसार)
७. एस.सी, एस.टी. प्रवर्गातील विद्यार्थी वगळून इतर सर्व मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना नॉन क्रिमीलेयर सर्टिफिकेट आवश्यक आहे. (Non Creamy Layer) (१ एप्रिल २०१३ ते ३१ मार्च २०१४ पर्यंत मुदत असलेले)
८. भारतीय नागरिकत्वाचे प्रमाणपत्र नागरिकत्वाच्या पुराव्यासाठी जन्मप्रमाणपत्र किंवा पासपोर्ट किंवा शाळा सोडल्याच्या दाखल्यामध्ये जन्मगांव किंवा नागरिकत्वाच्या रकान्यामध्ये तशी नोंद असणे आवश्यक आहे.
९. पात्रता प्रमाणपत्र (आवश्यकतेनुसार)

**ब) आवश्यक प्रमाणपत्र/कागदपत्रे**

१. रिक्त जागा असल्यास अभ्यासक्रमनिहाय माहिती.
२. चालू शैक्षणिक वर्षात अभ्यासक्रम पुढे सुरु ठेवण्यास मान्यतेचे अखिल भारतीय तंत्रशिक्षण परीषदेचे पत्र.
३. संस्थास्तरावर केलेल्या प्रवेशासाठी जाहीरात, प्रवेश अर्जाचा नमूना व प्रवेश नियमावली, प्रवेश फेरीचे वेळापत्रक **प्रवेश फेरीप्रमाणे विद्यार्थ्यांचे उपस्थितीपत्रक** इ.कागदपत्रे
४. कॅप अंतर्गत व संस्थास्तरावरील कोटयातील प्रवेशाचा अर्जाचा तपशिल व त्या अनुषंगाने तयार केलेली गुणवत्ता यादी. सदर गुणवत्ता यादी डीटीई मेरीट नंबर प्रमाणे असणे आवश्यक आहे.
५. तक्रारींबाबतचा अहवाल (अद्याप या कार्यालयास सादर केलेले नसल्यास)
   अ) विद्यार्थी
   ब) कर्मचारी/इतर
६. गुणवता/प्रवेशयादी सोबत खालील प्रपत्रात माहिती सादर करावी.

| S. No | Course | Intake | Regular | Back-log | Internal Transfer | External Transfer | 12th Science | 12th Science Technical/ Vocational | ITI | MCVC | Total Filled | Vacant Seat | Total |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 |

Cut off Date : **31.07.2013**